या जागेसाठी
जाहिरात
घेणे आहे

दैनिक
लोकक्रांतीचा आरंभ

# लोकआरंभ

LOK AARAMBH

dainiklokaarambh@gmail.com

संपादकःराहुल मारोतीराव वाईकर

बीड/महाराष्ट्र वर्ष २ रे | गरुवार ९ मे २०२४ | अंक१५० ● पाने ४ | RNI/MAHMAR/2022/84215 | किंमत २ रु

प्रतिनिधी
नेमणे आहे.

बीड आंबेजोगाई गेवराई वडवणी केज परळी पाटोदा शिरूर कासार धारूर आष्टी माजलगाव इच्छुकाने संपर्क साधावा
94036 41482

# मोदी देशापेक्षा स्वत:ला मोठे समजत आहेत-प्रकाश आंबेडकर

## पार्लमेंट हे देशाच्या सुरक्षेचे कवच आहे येथे नीतिमता असणारे अशोक हिंगेला संसदेत पाठवा




**प्रतिनिधी/बीड**

पार्लमेंट हे देशाचे सुरक्षा कवच आहे इथे नीतिमत्ता असणारा अशोक हिंगे सारखा उमेदवार निवडून द्या असे आव्हान यावेळी केले ते आज वंचित बहुजन आघाडीचे उमेदवार अशोकराव हिंगे पाटील यांच्या प्रचारार्थ आयोजित सभेत बोलत होते

पुढे बोलताना ऍड आंबेडकर म्हणाले की शरद पवार म्हणतात भाजपला हरवलं पाहिजे तर मग तुम्ही राजनाथसिहं सोबत काय गुलूगुलू गप्पा मारता देशातील जनतेला मूर्ख बनवायचे प्रताप पवारांनी आता थांबवायला हवेत. राष्ट्रवादीकडे नीतिमता नावाची गोष्ट उरलेली नाही. मराठ्यांचे खरे विरोधक शरद पवारच आहेत असेही प्रकाश आंबेडकर यांनी सांगितले मनोज जरांगे पाटील यांचे आंदोलन नवीन आहे १९८७ पासून अण्णासाहेब पाटील यांनी मराठा समाजासाठी आंदोलन केली मात्र सत्तेत असलेल्या शरद पवारांनी मराठा समाजाला गांभीर्याने घेतलेच नाही असे सांगितले शरद पवार चळवळ संपविणारा नेता आहे त्यामुळे एका माणसामुळे मराठा समाज बदनाम होऊ देऊ नका असे आव्हान मराठा समाजाला आंबेडकरानी केले .भारतीय जनता पार्टी सर्वात बरबटलेला पक्ष आहे मोदी घटना विरोधी माणूस आहे आणि सर्वात खोटारडा पंतप्रधान आहे असा पंतप्रधान मी आतापर्यंत पाहिलाच नाही मोदीच्या या अशा वागण्यामुळे देशाची असुरक्षितेकडे वाटचाल चालू आहे मोदी देशापेक्षा स्वतःला मोठे समजत आहेत त्यामुळे मोदी आणि आरएसएस प्रणित भारतीय जनता पार्टीला सत्तेपासून दूर ठेवणे गरजेचे आहे असे सांगत देशाची पार्लमेंट (संसद) हे देशाचे सुरक्षा कवच आहे इथे नीतिमता असलेले म्हणजेच अशोक हिंगे सारखे तरुण तडफदार खासदार निवडून जाणे गरजेचे आहे असे मत ऍड प्रकाश आंबेडकर यांनी व्यक्त केले.

यावेळी प्रकाश आंबेडकर, उमेदवार अशोक हिंगे पाटील, सर्वजित बनसोडे,विष्णु जाधव, तय्यब जफर, मुजमिल पटेल, रमेश गायकवाड, महेश निनाळे, भारतीय बौद्ध महासभेचे जिल्हाध्यक्ष महालिंग निकाळजे,शैलेश कांबळे, ज्ञानेश्वर कवठेकर,डॉ नितिन सोनवणे, धम्मनंद साळवे, अँड.अनिता चक्रे,प्रा. छाया हिरवे, इंजि.विष्णु देवकाते,युनुस शेख,धम्मानंद कासारे, पुरुषोत्तम वीर,बालाजी जगतकर, अंकुश जाधव, सुदेस पोतदार भारत तांगडे,बाबुराव मस्के, प्रस्ताविक, अँड.राजेंद्र कोरडे, सुत्रसंचालन अजय सरवदे, भारतीय बौद्ध महासभेचे पदाधिकारी, समता सैनिक व सर्व जिल्ह्याचे तालुक्याचे पूर्व व पश्चिम पदाधिकारी कार्यकर्ते मोठ्या संख्ये उपस्थित होते. भीम आर्मी संघटनेचे जिल्हाध्यक्ष सिद्धार्थ मायदळे ,तालुका सचिन देशमाने यांचा अशोक हिगे जाहिर पाठींबा दिला. पारधी समाजाच्या महिलांचे शिष्टमंडळ भेटले अन्य अत्याचार प्रकरणी निवेदन घेऊन भेटले साहेबांनी या प्रश्न दखल घेतली.

### आरपीआय गवई गटाचा अशोक हिंगे यांना जाहीर पाठिंबा - माणिक वाघमारे

महायुती, महाविकास आघाडी हे दोन्ही पक्ष शेतकरी दिन दलित दुबळे यांची फसवणूक करणारे पक्ष आहेत यांना सत्तेपासून दूर ठेवण्यासाठी वंचित बहुजन आघाडीचे उमेदवार अशोक हिंगे पाटील यांना जाहीर पाठिंबा देऊन संसदेत पाठवणारच असंही माणिक वाघमारे यांनी सांगितले यावेळी ए आय एम चे प्रदेशाध्यक्ष एजाज बाबर आष्टी येथील गोसावी समाजाच्या महिला नेत्या, मुस्लिम समाजाच्या महिला नेत्या यांनी वंचित बहुजन आघाडीचे जाहीर प्रवेश केला.

## बुधवारपर्यंत १०६९ टपाली मतदान

बीड, दि.8: रविवारपासून सुरू झालेले टपाली मतदान आज बुधवार रोजी पर्यंत 1069 इतक्या नागरिकांनी मतदानाचा हक्क बजावला. याअंतर्गत 8 सर्विस मतदार, 2 गृह मतदरांनी आणि सुविधा केंद्रतून पोस्टल बॅलेटद्वारे 8 मतदारांनी मतदान केले. आज बुधवारी 08 सर्विस मतदारांनी पोस्टल बॅलेटद्वारे मतदान केले. यासह 85 वयोगटाच्या अधिकचे आणि दिव्यांग मतदारांसाठी गृह मतदानाची सोय उपलब्ध करून देण्यात आली आहे. यामध्ये 85 वयोगटाच्या अधिक 01 मतदाराने तर 01 मतदार हे दिव्यांग होते. असे एकूण 02 मतदारांनी गृह मतदान केले. आष्टी विधानसभा मतदारसंघातील सुविधा केंद्रात 8 मतदारांनी पोस्टल बॅलेट द्वारे मतदान केले. रविवारपासून टपाली मतदानाला सुरूवात झाली असून आजपर्यंत 1069 मतदारांनी मतदान केले.

### लग्नसराईत नववधूचं मन प्रफुल्लित करणारं लग्नगीत....

मुंबई;- (प्रमोद तरळ) दरवर्षी आपल्या रसाळ गायकीतून काहीतरी हटके करणारे शाहीर प्रफुल्ल पुजारी बुवा यंदाही एक मजेदार असे लग्नगीत घेऊन येत आहेत. हे लग्नगीत यंदा तसेच इथून पुढे घराघरात वाजणार हे मात्र खरे. उत्तम शब्दरचना, सुमधुर धून, मंजूळ स्वर आणि मनभावक संगीत या सगळ्या गोष्टींमुळे हे गीत परिपूर्ण ठरणार आहे.

हे गीत कोकणातील सुप्रसिद्ध सेलिब्रिटी कवी निलेश उजाळ यांनी लिहिले असून ज्ञानदीप कासले यांनी संगीतबद्ध केले आहे, तसेच अमृता म्हादये यांनी प्रफुल्ल बुवांसोबत उत्तमरित्या गायले आहे. या गाण्याला पूर्णत्वास नेण्यासाठी शाहीर प्रफुल्ल बुवा पुजारी, शाहीर सचिन पानगले, विशाल पाटील आणि अमित म्हादये यांनी खूप मेहनत घेतली आहे.

# बजरंग सोनवणे निवडून येणार, काळ्या दगडावरची पांढरी रेघ जयंत पाटील

गेवराई / प्रतिनिधी

दहा वर्षे सत्तेत असलेल्या पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि भारतीय जनता पार्टी यांनी जनतेसाठी काय केले? पेट्रोल, डिझेल, खत यांची भाववाढ केली. महागाई वाढली, बेरोजगारी वाढली. दिलेला शब्द पाळला नाही त्यामुळे महाराष्ट्रात नरेंद्र मोदी यांचा टिकाव लागणार नाही, हे लक्षात आल्याने भाजपने राज्यातले शिवसेना आणि राष्ट्रवादी पक्ष फोडले. परंतु हे जनतेला पटले नाही त्यामुळे देशातील जनता भाजपा विरोधात गेली आहे. बजरंग सोनवणे यांच्या पराभवाची इच्छा व्यक्त करण्यासाठी थेट पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना बीड जिल्ह्यात सभा घ्यावी लागली हाच मुळात भाजपचा पराभव असल्याचे स्पष्ट प्रतिपादन राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील यांनी केले आहे. तर विजय आपलाच होणार आहे प्रत्येकाने आपल्या गावचे शंभर टक्के मतदान करून घ्यावे असे आवाहन शिवसेना माजी राज्यमंत्री बदामराव पंडित यांनी केले.



गेवराई तालुक्यातून सर्वाधिक मताधिक्य बजरंग बाप्पांना मिळेल असा विश्वास माजी मंत्री सुरेश नवले यांनी व्यक्त केला. महाविकास आघाडीचे उमेदवार बजरंग मनोहर सोनवणे यांच्या विजयासाठी गेवराईतील भाग्यलक्ष्मी लॉन्स येथे झालेल्या विराट सभेत ते बोलत होते. याप्रसंगी माजी आरोग्यमंत्री राजेश टोपे, आमदार संदीप क्षीरसागर, माजी आमदार उषाताई दराडे, माजी आमदार सय्यद सलीम, माजी आमदार सुनील धांडे, युवक राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष शेख महबूब, शिवसेना जिल्हा समन्वयक युधाजित पंडित, शिवसेना जिल्हाप्रमुख परमेश्वर सातपुते, जिल्हाप्रमुख गणेश वरेकर, जिल्हाप्रमुख प्रभाकर शिंदे, काँग्रेस जिल्हाध्यक्ष राजेसाहेब देशमुख, आम आदमी पार्टी जिल्हाध्यक्ष अशोक येडे, युवानेते रोहित पंडित, अजिंक्य चांदणे, अभिजीत पंडित, दिलीप गोरे, शिवसेना तालुकाप्रमुख अजय दाभाडे, किसान सेल प्रदेशाध्यक्ष पूजा मोरे, राष्ट्रवादी काँग्रेस तालुकाध्यक्ष आण्णासाहेब राठोड, अॅड हेमाताई पिंपळे, युवक काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष श्रीनिवास बेदरे रिपाईचे प्रदेश उपाध्यक्ष धम्मपाल कांडेकर उपजिल्हाप्रमुख बबलू खराडे आदींची प्रमुख उपस्थिती होती

संपादकीय

# वृत्तबद्ध कविता ते गझल

काव्य योग काव्य संस्था पुणे व लेखन अन् मी साहित्य समूह यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित "वृत्तबद्ध कविता ते गझल कार्यशाळा" यादोन्हीसमुहाचापहिलाउपक्रमथाटातपारपडला. यावेळी उत्कर्ष इंग्लिश मिडीयम स्कूल चे संस्थापक मा.शरदचंद्र काकडे देशमुख व कात्रज शाळेच्या प्राचार्या सौ.पुष्पा ओंबासे तसेच ज्येष्ठ साहित्यिक, गझलकार,समीक्षक मा.विजय जोशी सर यांच्या हस्ते कार्यक्रमाचे उद्घाटन झाले. दोन्ही समूहाचे अध्यक्षांचे कित्येक दिवसापासून जे स्वप्न होते ते पार पडले.इतरांना कविता कशी लिहावी,लय, ताल,वृत्तबद्ध, मात्रा, दीर्घ , रहस्व. तसेच गझल म्हणजे काय मतला, शेर याचा अर्थ समजून सांगितला.असे उत्तम मार्गदर्शन ज्येष्ठ साहित्यिक,गझलकार, समीक्षक मा.विजय जोशी सर यांनी केले. अर्थातच त्यांना (विजो) या नावाने ओळखले जाते.ही कार्यशाळा २१ एप्रिल २०२४ रोजी कात्रज पुणे उत्कर्ष इंग्लिश मिडीयम शाळेत पार पडली यात तब्बल ५० कवी,लेखकांनी सहभाग घेतला होता.प्रत्येकाने ह्या कार्यशाळेला उपस्थित राहून ज्ञानाचे भांडार संपादन केला. तसेच प्रत्येकाने त्यांना पडलेले प्रश्न विचारले त्या प्रश्नाने विजय जोशी सरांनी निरसन ही केली. प्रत्येकाला भरपूर काही शिकायला मिळाले. विशेष म्हणजे प्रत्येक सहभागी कवी,लेखकांना या कार्यशाळेत उपस्थित राहून बालपणीच्या आठवणी ताज्या झाल्या. ते बाक,शिक्षक आणि आठ तास एका वर्गात बसणे याचा त्यांना खूप आनंद झाला.आणि अशी संधी मिळत नाही. असे काही कवींनी आपला अभिप्राय दिला. काव्ययोग काव्य संस्था पुणे याचे अध्यक्ष योगेश हरणे तसेच लेखन अन् मी साहित्य समूह कोल्हापूर याचे अध्यक्ष मा.रमेश पाटील यांनी ज्या साहित्यिक कार्य करण्याचा वसा घेतला आहे तो वसा असाच निरंतर चालू राहील.समजाचं आपण काही तरी देणं लागतो आणि हे देणं पूर्ण करण्याचा वसा योगेश हरणे आणि रमेश पाटील हे करत आहेत. मग ते कुठल्या क्षेत्रात समाज कार्य करा.पण समाजासाठी काही तरी करा.असे मनोगत मा.विजय जोशी सरांनी दिले.तसेच ही कार्यशाळा पुढे दोन महिने ऑनलाईन घेतली जाईल आणि त्याचा सराव करून घेतला जाईल. असे आश्वासन मा.विजय जोशी सरांनी दिले. असेच साहित्यिक कार्य पुढे घडत राहील.असे आश्वासन काव्य योग काव्य संस्था पुणे अध्यक्ष योगेश हरणे सरांनी दिले.

(मुंबईत विजेवरील ट्रॅम आरंभ दिन.)

सुरवातीला ट्रॅमगाड्या घोडे ओढत असत. नंतर त्या वीजेवर चालविण्यात आल्या. मुंबई वीज पुरवठा आणि ट्रॅमवेज कंपनी मर्यादितने मुंबई ट्रॅमवेज कंपनी विकत घेतली. हीच आताच्या बेस्टची मूळ कंपनी होय. दि.७ मे १९०७ रोजी पहिली विजेवरची ट्रॅम धावली. सन १९२० साली दुमजली ट्रॅमसेवा चालू झाली. सन १९२४ पासून रेल्वे वीजेवर चालू लागली होती तर सन १९२६ साली बससेवा चालू झाली. बस व रेल्वे सेवा जलद गतीने असल्याने ट्रॅमसेवा तोट्यात गेली. शेवटी ट्रॅमसेवा बंद करण्यात आली. सदर रोचक ज्ञानवर्धकसंकलित माहितीचा लेख श्री एन. कृष्णकुमार जी. गुरूजींच्या शब्दातून जरूर वाचा... संपादक. ट्रॅम हे विजेवर चालणारे पूर्वीचे वाहन आहे. यासाठी रस्त्यातच रूळ टाकलेले असतात. या वाहनामुळे वाहतूक कोंडी होवू शकते. तसेच यांचा वेगही मर्यादित असतो. भारतात पूर्वी मुंबई येथे ट्रॅम सेवा होती. तसेच कलकत्ता येथेही ट्रॅम धावत असत. युरोपमधले अनेक देश तसेच ऑस्ट्रेलियातील काही शहरे येथे ट्रॅम हे सार्वजनिक वाहतुकीचे साधन म्हणून वापरले जाते. ट्रॅमसेवा ही मुंबई शहरातील पहिली सार्वजनिक वाहतूक व्यवस्था होय. मुंबईत दि.१९ मे १८७४ रोजी पहिली ट्रॅमसेवा चालू झाली. मुंबई ट्रामवे कंपनी, मुंबई महानगरपालिका आणि मुंबई सरकार यांच्यात करार होऊन तिचे नियोजन झाले. सुरवातीला ट्रॅमगाड्या घोडे ओढत असत. नंतर त्या वीजेवर चालविण्यात आल्या. मुंबई वीज पुरवठा आणि ट्रॅमवेज कंपनी मर्यादितने मुंबई ट्रॅमवेज कंपनी विकत घेतली. हीच आताच्या बेस्टची मूळ कंपनी होय. दि.७ मे १९०७ रोजी पहिली विजेवरची ट्रॅम धावली. सन १९२० साली दुमजली ट्रॅमसेवा चालू झाली. सन १९२४ पासून रेल्वे वीजेवर चालू लागली होती तर सन १९२६ साली बससेवा चालू झाली. बस व रेल्वे सेवा जलद गतीने असल्याने ट्रॅमसेवा तोट्यात गेली. शेवटी ट्रॅमसेवा बंद करण्यात आली. दि.३१ मार्च १९६४ रोजी रात्री १० वाजता बोरिबंदर ते दादर शेवटची ट्रॅमगाडी धावली. त्या शेवटच्या दिवशी हजारो मुंबईकरांनी तिला दुतर्फा प्रचंड गर्दी करून हळहळत निरोप दिला होता. त्यादिवशी ७१,९४७ प्रवाश्यांनी ट्रॅममधून प्रवास केला. त्याचे उत्पन्न ४,२६० रुपये होते. सुरुवातीला एक आण्यात कुठेही प्रवास करायची सुविधा होती. नंतर दीड आणा आणि नंतर दोन आणे तिकीट झाले. माटुंगा सर्वात दूरचे स्थानक होते. सहा नंबरची ट्रॅमगाडी फोरासमार्गे कुलाबा ते गिरगाव धावायची. चालकाजवळ पायापाशी वर्दी देण्यासाठी घंटा असायची. ससून डॉक ते छत्रपती शिवाजी महाराज वस्तुसंग्रहालय, वाडीबंदर, लालबाग, जेकब सर्कल, ताडदेव, ऑपेरा हाऊस, ग्रँटरोड ते जेजे हॉस्पिटल, धोबीतलाव ते कर्नाटक बंदर असे शहरभर जाळे होते. ट्रॅम गोल फिरून वळायची आणि उलट दिशेने धावायची. आताच्या गोलाकार बागा या तेव्हाची ट्रॅमची स्थानके होती. किंग्ज सर्कल, सायन सर्कल, दादर टीटी ट्रॅम टर्मिनस ही त्यातील काही ठिकाणे होत. बा.सी. मर्ढेकरांच्या खालील शब्दात ती अजरामर झाली आहे-

"जिथे मारते कांदेवाडी
टांग जराशी ठाकुरद्वार|
खडखडते अन् ट्राम वाकडी,
कंबर मोडुनी, चाटित तारा||"

मुंबईत कुलाबा ते क्रॉफर्ड मार्केट या मार्गावर पहिली विजेवर चालणारी ट्रॅमगाडी सुरू झाली आणि घोड्यांच्या

## घोड्यांच्या ट्रॅमचे युग समाप्त!

ट्रॅमचे युग समाप्त झाले. मुंबई शहरात ट्रॅम धावत होती, हे आजच्या पिढीला ज्ञात नाही. दि.९ मे १८७४ रोजी मुंबईत घोड्यांनी ओढल्या जाणाऱ्या ट्रॅम सुरू झाल्या होत्या. घोड्याची ट्रॅम सुरु होण्यापूर्वी मुंबईत मुख्य वाहतुकीचे साधन म्हणजे मेणे व छकडे होते. घोड्याने चालवलेला टांगा हे वाहन सन १८८०मध्ये मुंबईत प्रथम आले. अस्सल मुंबईकर याला टांगा म्हणण्यापेक्षा व्हिक्टोरिया हे भारदस्त इंग्रजी नावं देत असत. कुलाबा ते क्रॉफर्ड मार्केट, पायधुनी ते बोरीबंदर आणि बोरीबंदर ते काळबादेवी- पायधुनी या मार्गावर घोड्यांनी ट्रॅम खेचली. पहिल्याच दिवशी ४४ घोड्यांसह ६ ट्रॅमगाड्यांनी ४३ फेऱ्या केल्या. ४५१ प्रवाशांकडून ८४ रुपये ९ पैसे जमा झाले. ट्रॅम ओढण्यासाठी आणलेल्या विलायती घोड्यांना उन्हाचा त्रास होऊ नये म्हणून त्यांना टोप्या घालत असत. या ट्रॅममध्ये कंडक्टर असायचा पण तिकीटं नसायची. त्यावेळी कोणी प्रवासी फुकट म्हणजे पैसे न देता प्रवास करणारा आहे की नाही हे तपासून पाहिलेच नव्हते. एवढेच नव्हे कंडक्टर जे काही पैसे गोळा करत होते, ते बरोबर कंपनीकडे जमा करत होते की नाही, याचाही काही बंदोबस्त केलेला नव्हता. पण हा मामला फार काळ टिकला नाही. चार महिन्यांनंतर ट्रॅमच्या तिकिटांची कल्पना सुचली आणि ट्रॅमचं उत्पन्न वाढू लागलं. उत्पन्न वाढू लागल्यावर ट्रॅमचं तिकीट कमी करुन एक आणा करण्याचं औदार्य त्या काळच्या सरकारनं दाखवलं. ही ट्रॅमसेवा सुमारे ३१ वर्षे सुरू होती. दि.९ मे १८७४ पासून दि.७ मे १९०७ पर्यंत एकतीस वर्षांनंतर शेवटच्या दिवशी जेव्हा साधी ट्रॅम बंद झाली, त्यादिवशी ७१ हजार ९७४ प्रवाशांनी ट्रॅममधून प्रवास केला. ४२६० इतकं उत्पन्न त्यादिवशी जमा झालं. म्युझियम ते ससून डॉक, लालबाग, जेकब सर्कल, ऑपेरा हाऊस, करनॅक बंदर ते धोबी तलाव, जेजे हॉस्पिटल ते ग्रँट रोड या मार्गावर त्यावेळी ट्रॅम धावायची. म्युझियमपासून दादरपर्यंतचा प्रवास त्याकाळी फक्त दीड आण्यात व्हायचा.

सन १९०५मध्ये बॉम्बे इलेक्ट्रिक सप्लाय ऍण्ड ट्रॅम्वेज कंपनी लिमिटेड ही कंपनी म्युनिसिपालिटीने विकत घेतली. दि.७ मे १९०७ला वीजेवर चालणारी ट्रॅमगाडी सुरू झाली. पहिली ट्रॅमगाडी लंडनच्या ब्रश इलेक्ट्रिकल कंपनीने दिली होती. त्यावेळी ट्रॅमगाड्यांमध्ये उभं राहण्याची व्यवस्था होती आणि अप्पर क्लास आणि लोवर क्लास अशी विभागणी करण्यात आली होती. पण पहिल्याच दिवशी मालवणकर नावाचे प्रवासी ट्रॅममधून रुळांवर पडले आणि त्यांचा पाय तुटला. कालांतरानं ट्रॅममध्ये उभं राहायला म्युनिसिपाल्टीनं बंदी घातली आणि सन १९२० साली दुमजली ट्रॅम सुरू झाली. नंतर बोरीबंदर ते जे.जे.हॉस्पिटल आणि राणीची बाग अशी ट्रॅमगाडी धावू लागली. सन १९०७ साली ट्रॅमचे विद्युतीकरण झाले आणि ती किंग्ज सर्कल पर्यंत धावू लागली. तोपर्यंत ट्रॅमचे शेवटचे ठिकाण (टर्मिनस) दादरचे खोदादाद सर्कल होते. म्हणूनच ट्रॅम संपुष्टात येऊन इतकी वर्षे लोटली तरी खोदादाद सर्कलचे दादर टी.टी. हे नावं आजही कानावर येते; कारण दादर टी टी म्हणजे दादर ट्रॅम टर्मिनस होय. हे नाव आज ट्रॅम बंद पडली तरी वापरले जाते, नव्हे हेच नाव या भागाची ओळख आहे.

# पंकजाताई मुंडे यांना महात्मा फुले युवा दलाचा जाहीर पाठिंबा

## पंकजाताईंची मतदारसंघात ताकत वाढली

**बीड/ प्रतिनिधी**

बीड जिल्ह्यामध्ये माळी समाजात सक्रिय आणि लोकप्रिय असलेल्या महात्मा फुले युवा दलाच्या वतीने बीड लोकसभा मतदारसंघाच्या भाजपा महायुतीच्या उमेदवार पंकजाताई मुंडे यांना जाहीर पाठिंबा देण्यात आला. बीड जिल्हाप्रमुख अजय शिंदे यांच्यासह पदाधिकाऱ्यांनी प्रत्यक्ष भेटून पंकजा ताईंना पाठिंबाचे पत्र दिले.

महात्मा फुले युवा दलाचे मार्गदर्शक आणि भाजप नेते अतुल सावे व संस्थापक प्रमुख एड.सतीश शिंदे यांच्या आदेशावरून महात्मा फुले युवा दलाचे बीड जिल्हाध्यक्ष अजय शिंदे व त्यांच्या सर्व सहकाऱ्यांनी भाजपा महायुतीच्या बीड लोकसभा उमेदवार माजी मंत्री पंकजाताई मुंडे यांना जाहीर पाठिंबाचे पत्र दिले. हे पत्र दिल्याने पंकजाताईंची जिल्ह्यात ताकद वाढली असून माळी समाज पूर्ण ताकतीने पंकजाताई मुंडे यांच्या पाठीशी उभा राहील अशी ग्वाही अजय शिंदे यांनी यावेळी दिली. यावेळी पंकजाताई मुंडे यांनी महात्मा फुले युवा दलाचे आभार मानून माळी समाजाच्या प्रश्नासाठी आपण कायम प्रयत्न करू अशी ग्वाही त्यांनी यावेळी दिली. संपुर्ण माळी समाज आपल्या पाठीशी खंबीरपणे उभा राहील असा विश्वास अजय शिंदे यांनी व्यक्त केला .यावेळी महात्मा फुले युवा दलाचे जिल्हाप्रमुख अजय शिंदे , नाळवंडीचे सरपंच एड. राजेंद्र राऊत, महात्मा फुले युवा दल बीड तालुका प्रमुख विठ्ठल साळुंके व पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते .महात्मा फुले युवा दलाने पाठिंबा दिल्याने पंकजाताई मुंडे यांनी भाजप नेते अतुल सावे महात्मा फुले युवा दलाचे संस्थापक प्रमुख एड.सतीश शिंदे यांचेही आभार




मानले. माळी समाज पंकजाताई यांच्या पाठीशी उभा राहिला तर पंकजाताई यांचा विजय निश्चित असल्याची चर्चा यावेळी झाली.

# परळी येथील ईव्हीएम कार्यान्वित प्रक्रियेची जिल्हा निवडणूक अधिकारी यांनी केली पाहणी

## बीड, दि. ८: बीड लोकसभा मतदारसंघात मतदान सोमवार दिनांक १३ मे रोजी होणार असून यासाठीची जय्यत तयारी सुरू आहे.

सहा विधानसभांमधील मतदान केंद्रानुसार सरमिसळ झालेली असून आता या मशीनचे कमिशनिंग म्हणजेच बॅलेट युनिटमध्ये बॅलेट पेपर लावणे, कंट्रोल युनिट तपासणे आणि व्हीव्हीपॅट कागदाचे रोल तसेच त्याची तपासणी करून सील करण्याची प्रक्रिया सुरू आहे. परळी येथील होत असलेल्या कमिशनिंगच्या ठिकाणी मंगळवारी जिल्हा निवडणूक अधिकारी दीपा मुधोळ मुंडे यांनी भेट देऊन प्रत्यक्ष पाहणी केली. यावेळी परळी विधानसभेचे सहायक निवडणूक अधिकारी अरविंद लाटकर व परळीचे तहसीलदार व्यंकटेश मुंडे , नायब तहसिलदार मिलिंद गायकवाड, बाबुराव रुपनर, अन्ना वंजारे हे ईव्हीम प्रक्रिया पाहणी करते वेळी सोबत उपस्थित होते.परळी येथे अकुण ३४२



मतदान केंद्राकरिता 35 टेबलावर सिलींग प्रक्रिया करण्यात आली . याप्रसंगी बीड जिल्हाधिकारी तथा निवडणूक निर्णय अधिकारी यांनी काही ईव्हीम सिलींगबाबत महत्वाच्या सूचना करताना सुरक्षात्मक उपायांबद्दल माहिती दिली. तसेच यावेळी 1000 मॉक पोल करिता 5 टक्के या नुसार 18 मतदान केंद्र चिठ्ठ्या राजकीय पक्ष प्रतिनीधीचे उपस्थितीत काढण्यात आल्या. कमिशनिंग नंतर स्टॉग रुम मध्ये मशीन सील करून ठेवण्यात येणार आहेत . सिलींग केलेल्या मशीनस दिनांक 12 मे 2024 रोजी मतदान केंद्रात मतदान केंद्राध्यक्षकासह पाठवण्यात येतील. दिनांक 13 मे रोजी मतदान सुरु होण्याच्या दीड तासापूर्वी उमेदवार यांचे मतदान प्रतिनिधी यांचे समक्ष अभिरुप मतदान घेऊन निवडणूक आयोगाने सांगितलेल्या प्रक्रियेनुसार ईव्हीम मशीनद्वारे प्रत्यक्ष मतदानाला सकाळी 07 .00 वाजता सुरवात होईल. ईव्हीएम मशीन्सला हाताळण्याचे तांत्रिक प्रशिक्षण सर्व पथकांना व मतदान अधिकारी यांना दिलेले असून त्याप्रमाणे मतदान सुरळीत पार पडण्यासाठी सर्व आवश्यक व योग्य ती कार्यवाही मतदान दिनांक 13 मे 2024 रोजी करण्यात यावी, अशा सूचना जिल्हा निवडणूक अधिकारी यांनी उपस्थित अधिकारी व क्षेत्रीय अधिकारी यांना केल्या.

# देशाच्या इतिहासात असा एक माणूस नाही जो माझ्याएवढ:; शरद पवार नेमकं काय म्हणाले?



सुप्रिया सुळे आणि अमोल कोल्हे यांनी मतदारसंघासाठी निधी आणला नसल्याचं वक्तव्य अजित पवार यांनी केलं होतं. याला शरद पवार यांनी उत्तर दिलं आहे. आज काही लोक सांगतात, लोकसभेत जायचं नुसतं जाऊन काय उपयोग? निधी आणावा लागतो... आज मला विधानसभा, लोकसभा आणि राज्यसभा या तीन ठिकाणी जाऊन 56 वर्षे झाली. हिंदुस्थानच्या राजकारणात असा एक ही माणूस नाही की, ज्याने या सभागृहात सलग 56 वर्षे पूर्ण केली असतील. चांगलं काम करणारा जागृक सभासद असेल तर निधी मिळतो. ती जागृकता अमोल कोल्हे यांच्यामध्ये आहे, असं शरद पवार म्हणाले.

शरद पवारांकडून कौतुक

लोकसभेत गेल्यावर सत्ता आवश्यकच असते, असं नाही. सत्ता नसताना ही काम करता येत फक्त जागरूक सभासद म्हणून तुमचा लौकीक झाला पाहिजे. पुणे जिल्ह्यातून ग्रामीण भागातून दोन खासदार आहेत. ज्यांचं नाव देशातील लोकसभेत घेतलं जातं. एक माझी मुलगी सुप्रिया सुळे आणि दुसरे डॉ. अमोल कोल्हे..., असं म्हणत शरद पवार यांनी सुप्रिया सुळे आणि अमोल कोल्हे यांच्या कामाचं कौतुक केलं आहे. नुसतं शेती एके शेती करुन चालणार नाही. रांजणगावला जी जमिन दिसतेय. ती जिरायत असताना मला अस्वस्थ करायची. नंतर तिथे येऊन बैठक घेतली एमआयडीसी केली. स्थानिक लोकांनी सहकार्य केल्यानंतर काय होत याच उत्तम उदाहरण शिरूर रांजणगाव औद्योगिक वसाहत आहे. अनेक कामे होऊ शकली ती तुमच्या सहकार्यामुळे आणि पाठींब्यामुळे..., असंही शरद पवार म्हणाले.

पवारांकडून ते आश्वासन

सरकारमध्ये या तालुक्याला कमी संधी दिली, असं म्हटलं जातं. हे खरंय गेली अनेक वर्ष आंबेगावला वळसे पाटलांना मंत्रिपद दिलं गेलं. शिरूरला कमी संधी मिळाली, हे मी मान्य करतो. पण आता एक गोष्ट चांगली झाली चार पैकी तीन जणांनी आपला रस्ता बदलला. पण आता शिरूरला मंत्रिपदाची संधी मिळेल. अशोक पवारांच काम चांगलं त्यांना संधी मिळेल, असं म्हणत शरद पवारांची अशोक पवार यांच्या मंत्रिपदाबाबतची मोठी घोषणा केली आहे.

### रुपाली चाकणकर यांच्या अडचणी वाढल्या; EVM मशीनची केली पूजा; दाखल झाला गुन्हा

बारामती लोकसभा मतदारसंघ देशाच्या नकाशावर आला आहे. या मतदारसंघात आज सकाळपासून मोठं-मोठ्या घडामोडी घडल्या. अजित पवार यांचा 'मेरे पास माँ है' हा डायलॉग गाजला. तर सुप्रिया सुळे थेट अजित पवारांच्या घरी गेल्या. राजकीय वातावरण अशा प्रकारे ढवळून निघत असतानाच आता अजून एक धक्कादायक प्रकार समोर आला आहे. त्यामुळे राज्यासह देशात खळबळ उडाली आहे. राज्य महिला आयोगाच्या अध्यक्षा रुपाली चाकणकर यांनी ईव्हीएम मशीनची



पूजा केल्याने नवीन वाद ओढावून घेतला आहे. कुठे घडला हा प्रकार, नेमकं घडलं तरी काय?खडकवासाला परिसरातील घटना राज्य महिला आयोगाच्या अध्यक्षा रुपाली चाकणकर या खडकवासाला परिसरातील एका मतदान केंद्रावर पोहचल्या. मतदान सुरु होण्यापूर्वी त्या औक्षण करण्याचे ताट घेऊन मतदान केंद्रात दाखल झाल्या. त्यांनी ताटात दिवा पण ठेवलेला होता. त्यानंतर त्यांनी मतदान केंद्रातील ईव्हीएम मशीनची पूजा केली. आता त्यांनी ईव्हीएम मातेकडे काय मागितले असेल हे वेगळं सांगायची गरज आहे का?

# निवडणुकीसाठी कर्तव्यार्थ पोलीस अधिकारी व कर्मचारी तसेच मतदान कर्मचा-यांसाठी ९ ते ११ मे पर्यंत तहसील कार्यालयात मतदान सुविधा

बीड, दि. 8 : मतदानापासून कोणतेही अधिकारी, कर्मचारी वंचित राहू नये यासाठी, बीड लोकसभा मतदार संघाअंतर्गत येणारे 230-बीड विधानसभा मतदारसंघात दि.9, ते दि.11 आणि दि.12 मे रोजी पोस्टल मतदान घेण्यात येणार, असल्याचे सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी, कविता जाधव यांनी कळविले आहे. बीड विधानसभा मतदारसंघा अंतर्गत कार्यरत पोलीस अधिकारी, कर्मचारी यांच्यासाठी बीड तहसील कार्यालयात सुविधा केंद्र उभारण्यात आले असून या ठिकाणी सकाळी 09 ते सायंकाळी 05 वाजेपर्यंत मतदानाची सुविधा उपलब्ध करून दिली आहे. तसेच दिनांक 12 मे 2024 रोजी कृषी उत्पन्न बाजार समिती, कुर्ला रोड, बीड या ठिकाणी सुविधा केंद्र उभारून मतदान घेण्याची व्यवस्था ही करण्यात आलेली आहे. तसेच दिनांक 13 मे 2024 रोजी मतदान होणाऱ्या इतर जिल्ह्यातील जे अधिकारी, कर्मचारी यांची पोलिंग स्टाफ म्हणून 39-बीड लोकसभा मतदारसंघ अंतर्गत मतदानाच्या कामासाठी नियुक्ती करण्यात आलेली आहे व ज्यांनी पोस्टल मतदानाचा नमुना क्रमांक 12 अर्ज भरलेला आहे अशा अधिकारी कर्मचारी यांची व पोलीस अधिकारी कर्मचारी यांच्यासाठी तहसील कार्यालय बीड येथे तहसीलदार यांच्या दालनात दिनांक 9 ते 11 मे रोजी पर्यंत सुविधा केंद्र उभारून मतदानाची व्यवस्था करण्यात आलेली आहे. अशा मतदारांचे पोस्टल बॅलेट मतदानाची व्यवस्था सकाळी 09.00 ते सायंकाळी 05.00 वाजेपर्यंत करण्यात आली आहे. संबंधित अधिकारी, कर्मचारी यांनी निश्चित ठिकाणी हजर राहून आपले मतदान करून घ्यावे व कोणीही अधिकारी, कर्मचारी मतदानापासून वंचित राहू नये. असे आवाहन बीड विधानसभा मतदारसंघाच्या सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी कविता जाधव यांनी केले आहे.

दैनिक लोकक्रांतीचा आरंभ

# लोकआरंभ

गरुवार ९ मे २०२४






# कांद्याचा वांदा, निर्यात बंदी रद्द झाल्यानंतर अडचणी सुटेना, कांद्याचे ४०० कंटनेर अडकले




केंद्र सरकारने लोकसभा निवडणुकीच्या तिसऱ्या टप्पापूर्वी राज्यातील शेतकऱ्यांना गिफ्ट दिले होते. चार महिने 27 दिवसानंतर कांद्यावरील निर्यातबंदी हटवली. 40 टक्के निर्यात शुल्क लावून कांद्याची निर्यात करण्यास सरकारने परवानगी दिली. परंतु त्यानंतर अडचणी काही सुटत नाही. निर्यातबंदीचा निर्णय मागे घेऊन चार दिवसांपासून तांत्रिक कारणामुळे कांद्याचे 400 कंटनेर बंदरावरच अडकले. त्याचा फटका व्यापाऱ्यांना बसत आहे. आता आज ही अडचण दूर होण्याची शक्यता आहे. 400 कंटनेर बंदरावरच अडकले शेतकऱ्यांसाठी कांदा आणि टॉमेटो ही पिके नेहमी अडचणीची ठरतात. कधी अवकाळीचा फटका तर कधी बाजारभावाचा धोका या पिकांना बसतो. कमी उत्पन्न होताच दर वाढू नये म्हणून सरकारकडून निर्यातबंदी केली जाते. यामुळेच जवळपास पाच महिन्यांपासून कांद्याच्या निर्यातीस बंदी होती. अखेर ही बंदी 3 मे 2024 रोजी मागे घेतली गेली. त्यासंदर्भातील आदेश आला. परंतु जेएनपीटी आणि कस्टम विभागाची वेबसाईट अपडेट न झाल्यामुळे गोंधळ उडाला. चार दिवसांपासून वेबसाईट अपडेट झाली नसल्याने जवळपास 400 हून अधिक कांद्याचे कंटेनर मुंबईच्या जेएनपीटीमध्ये अडकले. यामुळे कांद्याची निर्यात बंदी उठवल्यानंतर देखील कांद्याचा वांदा सुरूच आहे. काय झाली अडचण कांद्या निर्यातबंदीसंदर्भात काढण्यात आलेल्या अधिसूचनेमध्ये स्पष्टता नव्हती. यामुळे ही वेबसाईट अपडेट व्हायला उशीर लागला. तांत्रिक अडचणीमुळे नाशिकच्या जामोरीतील दीडशे ते पावणेदोनशे कंटेनर जेएनपीटी बाहेर अडकले. कंटेनर कोळंबल्याने जहाजाचे भाडे देखील वाया गेले. त्याचा फटका व्यापाऱ्यांना बसला. आता आज परिस्थिती सुरळीत होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

## वाढत्या उन्हाचा कांद्यास फटका

कांद्याला भाव मिळेल या आशेने येवल्यातील अनेक शेतकऱ्यांनी उन्हाळी कांद्याचे पीक घेतले. मात्र ज्यावेळी कांदा विक्रीस आला. त्यावेळेस कांदा व्यापारी व माथाडी कामगारांमधील संघर्षामुळे बाजार समिती बंद होत्या. गेल्या महिन्याभर बाजार समिती बंद होत्या. त्यात उन्हाचा तडाख्यामुळे साठवलेला कांदा खराब झाला. यामुळे कांद्यावर केलेला खर्च देखील निघणे अवघड झाले आहे. यामुळे पुन्हा एकदा बळीराजा संकटात सापडला आहे

# ११७७ मतदान केंद्रावर असणार तिसरा डोळा

बीड दि. 8 : बीड लोकसभा मतदारसंघात सोमवार दिनांक 13 मे रोजी मतदान होणार असून यासाठी 2355 मतदान केंद्रे तयार आहेत. मतदान केंद्रावर काही अनुचित प्रकार घडू नये यासाठी यापैकी 50०/० टक्के असे 1177 मतदान केंद्राचे थेट प्रक्षेपण म्हणजेच वेब कास्टिंग होणार आहे. बीड लोकसभा मतदारसंघात येणा-या विधानसभा मतदार संघात अनुक्रमे गेवराई-199, माजलगाव-189, बीड-191, आष्टी-220, केज-207 आणि परळी-171 असे एकुण 1177 मतदान केंद्रावर वेब कास्टींग होणार आहे या विधानसभा मतदारसंघात



काही मतदान केंद्र हे संवेदनशील गटात मोडत असून अशा ठिकाणी वेब कास्टिंग ची सुविधा असणार आहे. यासह निश्चित झालेल्या ठिकाणी थेट प्रक्षेपणाची सुविधा उपलब्ध करून दिलेली आहे. सकाळी 5:30 वाजेपासून वाजेपासून ते सायंकाळी 6 वाजेपर्यंत वेब कास्टिंग होणार आहे. वेब कास्टिंगचे थेट प्रक्षेपण त्या विधानसभा मतदारसंघातील सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी यांच्या कक्षात नियंत्रण असणार आहे. तर एकूण सहाही विधानसभा मतदार संघाचे थेट प्रक्षेपण हे जिल्हा निवडणूक अधिकारी दीपा मुधोळ मुंडे यांच्या कक्षात दिसणार आहे. वेब कास्टिंग यंत्रणेद्वारे काही अनुचित प्रकार लक्षात आल्यास कायदा सुव्यवस्थेचे उल्लंघन केल्या सतात्काळ त्या मतदान केंद्रावर पोलिसांकडून कारवाई करण्यात येईल.

## शरद पवार यांचे उत्तर भाजपसाठी अलार्म?

यंदाच्या लोकसभा निवडणुकीत न भूतो न भविष्यति अशी सरळमिसळ झाली आहे. अनेक वर्षांपासूनचे मित्र एकमेकांविरोधात उभे ठाकले. तर वैचारिक शत्रू ही निवडणूक एकत्र लढत आहे. भारतीय जनता पक्षाच्या नेतृत्वात NDA तर काँग्रेससह INDIA Alliance असा काहीसा हा सामना आहे. याच पार्श्वभूमीवर एका वृत्तपत्राने शरद पवार यांची मुलाखत घेतली. त्यात गेल्या निवडणुकीपेक्षा यंदाच्या लोकसभा निवडणुकीत काय फरक आहे, कोणते आव्हान आहे, याचे मार्मिक उत्तर शरद पवार यांनी दिले आहे. त्यांचे उत्तर भाजपसाठी अलार्म तर नाही ना?विरोधकांकडे तरुण चेहरा2019 आणि 2024 मधील दोन निवडणुकीतील एक ठळक फरक शरद पवार यांनी मुलाखतीत सांगितला. मोठ्या प्रमाणात तरुणांची सक्रियता. सध्या त्यांच्या खेम्यात तरुण चेहरे आहेत. गेल्यावर्षीपेक्षा अधिक तरुणाई आपल्या गोटात असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. राजकारणात तरुणाई कुणाच्या बाजूने आहे, हे अप्रत्यक्षपणे त्यांनी स्पष्ट केले.

# भविष्यात जर काँग्रेस सत्तेत आली तर राम मंदिराला कुलूप लावतील; कुणाचं विधान ?

**प्रतिनिधी**

उद्धव ठाकरे सत्तेसाठी ते अशा लोकांसोबत बसले आहेत. पाकिस्तानचा अजेंडा काँग्रेस पक्ष पुढे नेत आहे. भविष्यात जर काँग्रेस सत्तेत आली तर हे राम मंदिराला कुलूप लावतील. इंडिया आघाडी जिंकली तर त्यांचा पंतप्रधान कोण असेल. त्यांना विचारलं तर ते एकेक वर्ष भागिदारीत बनणार अस म्हणतात. मोदीजींकडे दहा वर्षांच्या कामाचा हिशोब आहे आणि पुढच्या पंचविस वर्षाचा अजेंडाही आहे. नरेंद्र मोदींना पंतप्रधान बनवनं म्हणजे पाकिस्तानला जशाच तसं उत्तर दिलं आहे. इंडिया आघाडीकडे कोणताही प्रोग्रॅम नाहीये, असं म्हणत केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी काँग्रेस पक्षावर घणाघात केला आहे.



रावसाहेब दानवे यांना सहाव्यांदा निवडून द्या ते खुप मोठे माणूस बनणार आहे.

जालन्याला टॉपवर आणण्याचं काम करू. जिल्ह्यातल्या देवेस्थानाला प्रणाम... सरदार पटेल आणि स्वामी रामानंद तिर्थ यांना प्रणाम करतो, कारण निजामातून त्यांनी मुक्त केलं होतं. जालन्याची जनतेनं ठरवायचं हा देशा कुणाच्या हातात द्यायचा, असंही अमित शाह म्हणाले. इंडिया आघाडीवर निशाणा इंडिया आघाडीनं बारा लाख करोडचा घोटाळा केला. हा वर्षात बारा लाख करोड चा भ्रष्टाचार करणारी इंडिया आघाडी राहुल गांधींच्या नेतृत्वात आहे. आमच्या वर कुणी 25 पैशांचाही आरोप कुणी करू शकत नाही. गर्मीच्या दिवसात बॅकॉक आणि थायलंडच्या सुट्टीवर जाणारे राहुल गांधी आहे. एकही दिवस सुट्टी न घेतलेले मोदी आहेत मग तुम्ही ठरवा कुणाला निवडून द्यायचं. मोदींनी या देशाला समृद्ध केलं जगात देशाचा सन्मान वाढवला. या काँग्रेसवाल्यांनी वर्षानुवर्ष राम मंदिराचं काम थांबवून ठेवलं. मात्र मोदीजींनी करून दाखवलं, असंही अमित शाह यांनी म्हटलं आहे. मोदी सरकारच्या कामाचं कौतुक जालन्याचे बच्चा बच्चा काश्मीरसाठी जीव देवू शकतो. इंडिया आघाडीवाले 370 कमल सांभाळून बसले होते. मात्र मोदींनी ती हटवली. मोदींनी आतंकवाद आणि नक्षलवाद संपवून टाकला. इंदिरा गांधी म्हणून गेली गरिबी हटाव मात्र एकाही काँग्रेसवाल्यानं ते केलं नाही. मात्र 80 करोड गरिबांच्या घरी मोदीजींनी राशन पाठवलं. मोदीजीनी 130 करोड नागरिकांना लसीकरण करून सुरक्षित केलं, असंही अमित शाह म्हणाले.

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक राहुल मारुतीराव वाईकर यांनी राजवीर प्रिंटर्स, राजमाता जिजाऊ कॉलनी, नवगण कॉलेज रोड, बीड जि.बीड-४३११२२ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक लोक आरंभ कार्यालय, हाऊस नं.०१/०३/८६२० राजमाता जिजाऊ कॉलनी, नवगण कॉलेज रोड, बीड जि. बीड- ४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रसिद्ध केले. मो. ९२७२१३२४५०, संपादक: राहुल मारोतीराव वाईकर Email : dainiklokaarambh@gmail.com